महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ

शासकीय तंत्र निकेतन इमारत, क विभाग, दुसरा मजला, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१.
कार्यालय दुरध्वनी क्र. २६४७४४३५ Email : chairman-msbve@nic.in वेबसाईट - www.msbve.gov.in


**शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता मंडळाचे अभ्यासक्रम नव्याने सुरु करणेसाठी इच्छुक पंजीकृत संस्थांकडून / व्यवस्थापनांकडून तसेच यापूर्वी मान्यता दिलेल्या संस्थांकडून अर्ज मागविणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळामार्फत राबविण्यात येत असलेले प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यांकरीता अर्ज मागविण्यांत येत आहेत.

**१) मंडळाचे अभ्यासक्रम चालविण्यास इच्छुक असणारी संस्था ही माहितीपुस्तिकेतील मान्यता नियमावलीत नमुद केलेल्या १ ते १६ पैकी कोणत्याही एका प्रकारात मोडणारी असणे आवश्यक आहे.**

**२) विविध प्रकारचे करावयाच्या अर्जांचा तपशील खालीलप्रमाणे -**

| अ. क्र. | बाब | अर्ज करण्याचा कालावधी | अर्ज कोणाकडे करावयाचा त्याबाबतचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | मंडळाचे अभ्यासक्रम नव्याने सुरु करण्यासाठी अथवा जुन्या संस्थेत अस्तित्वात असलेल्या अभ्यासक्रमाच्या तुकडीत वाढ अथवा जुन्या संस्थेत नविन अभ्यासक्रम सुरू करणेसाठी करीता संस्थेच्या व्यवस्थापनाने करावयाचा अर्ज. | १) नियमित शुल्कासह - १५ डिसेंबर २०१६ ते १६ जानेवारी २०१७<br>२) विलंब शुल्कासह - १७ जानेवारी २०१७ ते ३१ जानेवारी २०१७<br>(शासकीय सुट्टया वगळून) | संबंधीत जिल्हयाचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, |
| २ | मंडळाने यापूर्वी मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांस संबंधीत व्यवस्थापनाने प्रत्येक वर्षानंतर नुतनीकरणासाठी करावयाचा अर्ज. | १) नियमित शुल्कासह - १५ डिसेंबर २०१६ ते १६ जानेवारी २०१७<br>२) विलंब शुल्कासह - १७ जानेवारी २०१७ ते ३१ जानेवारी २०१७<br>(शासकीय सुट्टया वगळून) | संबंधीत जिल्हयाचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, |
| ३ | मंडळाने यापूर्वी मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमासाठी तात्पुरती मान्यता पुढे चालू ठेवण्यासाठी ( स्थायी संलग्नता) संस्थेच्या व्यवस्थापनाने करावयाचा अर्ज. | १) नियमित शुल्कासह - १ जून २०१७ ते १५ जून २०१७<br>२) विलंब शुल्कासह - १६ जून २०१७ ते ३० जून २०१७ | संबंधीत जिल्हयाचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, |
| ४ | मंडळाने यापूर्वी मान्यता दिलेले अभ्यासक्रम नविन जागेत स्थलांतरीत करण्यासाठी संस्थेच्या व्यवस्थापनाने करावयाचा अर्ज. | संस्थांच्या आवश्यकतेनुसार कधीही अर्ज करता येईल. | संबंधीत जिल्हयाचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, |
| ५ | मंडळाने यापूर्वी मान्यता दिलेले अभ्यासक्रम / संस्था बंद करणे. | संस्थांच्या आवश्यकतेनुसार कधीही अर्ज करता येईल. | संबंधीत जिल्हयाचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, |
| ६ | मंडळाने यापूर्वी मान्यता दिलेले - संस्थेच्या नांवात बदल करणे. | संस्थांच्या आवश्यकतेनुसार कधीही अर्ज करता येईल. | संबंधीत जिल्हयाचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, |
| ७ | व्यवस्थापन समितीत बदल करणे | संस्थांच्या आवश्यकतेनुसार कधीही अर्ज करता येईल. | संबंधीत जिल्हयाचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, |

उपरोक्त बाबत संबंधीत अर्ज व माहितीपुस्तिका मंडळाचे संकेतस्थळावर ( **www.msbve.gov.in**) उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे आणि त्यासोबत सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचे कार्यालयीन पत्ते देण्यात आलेले आहेत.

इच्छुक संस्थांनी संकेत स्थळावरून सन २०१७-१८ साठी प्रसिध्द केलेल्या माहितीपुस्तिकेमधुन आवश्यक तो अर्ज डाऊनलोड करुन त्याची प्रिंट काढून परिपूर्ण माहिती भरलेला अर्ज व त्यासोबत आवश्यक ते कागदपत्रे, चलन (अर्ज रक्कम व प्रक्रिया शुल्क रक्कमेचे ), इत्यादी संबंधीत जिल्हयाचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय, यांचेकडे विहीत मुदतीत जमा करावयाचे आहे. मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

अधिक माहितीसाठी संबंधीत जिल्हयाचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेशी संपर्क साधावा अथवा मंडळाचे संकेतस्थळ www.msbve.gov.in पहावे.

(डी.ए.दळवी)
सचिव,
म.रा.व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,
मुंबई ४०० ०५१.